क्रमांक:पोअवा/आस्था./NPC TO HC/पदो.- / 4318 /२०२०, वाशिम. दिनांक :- 11 AUG 2020

# सुधारित-आदेश

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था/NPC To HC/पदो.-३६४९/दि.०३/०७/२०२० अन्वये महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२-अ/१६-ब, दिनांक २९/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन आरक्षण नसलेल्या खुल्या प्रवर्गातील तसेच इतर मागास वर्गीय प्रवर्गातील खालील नमुद "पोलीस नाईक" यांना "पोलीस हवालदार" वेतन मॅट्रिक S-९:२६४००-८३६००/- व विशेष वेतन रु.७५०/- मध्ये निव्वळ स्थानिक व तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचा Departmental Promotion Committee ने निर्णय घेतल्यांने त्यांना "पोलीस नाईक" ते "पोलीस हवालदार" पदावर पदोन्नती स्विकारल्याचे दिनांकापासून देण्यात आली होती.

| अ. क्र. | पदनाम | ब.नं. | कर्मचा-यांचे नांव | जात | प्रवर्ग | पदोन्नती समितीचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोना | ४९ | विनोद दामोधर सुर्वे | कुणबी | इमाव | पो.मु.वाशिम |
| २ | पोना | ९२२ | विष्णु दत्तात्रय इंगळे | मराठा | खुला | दहशतवाद विरोधी पथक,अकोला. |

२/- उपरोक्त दोन्ही पोलीस नाईक यांना Departmental Promotion Committee च्या दिनांक १६/०९/२०१९ च्या बैठकीमध्ये पदोन्नती करिता पात्र ठरविण्यात आले होते. परंतु नमुद पोलीस नाईक हे प्रतिनियुक्तीवर असल्यांने आणि त्यांची सेवाभिलेखाची माहिती अप्राप्त असल्यांने त्यांना प्रतिक्षेत ठेवण्यात आले होते. करिता सदरचे आदेशामध्ये अशंतःबदल करुन त्यांना दिनांक १६/०९/२०१९ पासून पोलीस हवालदार पदी पदोन्नती देण्यात येत आहे.

**( वसंत परदेशी )**
**भा.पो.से.**
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वाशिम./ दहशतवाद विरोधी पथक,अकोला.

२/- संबंधित अधिकारी यांनी पोलीस नाईक यांनी पदोन्नती स्विकारलेली आहे. त्याबाबतची नोंद स्टेशन डायरी मध्ये करुन घेवून त्यांची पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक व स्टे.डायरी च्या साना क्रमांकासह अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा. व ज्या पोलीस नाईक यांनी पोलीस हवालदार पदाची पदोन्नती स्विकारली नाही त्यांचा सुध्दा अहवाल उलट टपाली या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

३/- उपरोक्त आदेशात नमूद केलेल्या ज्या पोलीस नाईकांविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशीत अथवा संक्षीप्त कारवाई मध्ये निर्गमित केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही, अशा पोलीस नाईकांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा पदोन्नतीच्या पदात भोगण्यास ते तयार नसतील अशा कर्मचाऱ्यांनी त्यांचे लेखी पूर्वसंमती विनंती अर्ज घेवुन या कार्यालयास सादर करावी जर सदर कर्मचारी यांनी आदेश प्राप्त झाल्यावर ७ दिवसाचे आत लेखी संमती सादर केले नाही तर त्यांना देण्यात आलेली शिक्षा ते पदोन्नतीचे पदात भोगण्यास तयार असतील असे समजण्यात येईल, या बाबत त्यांना लेखी समज देवुन त्याबाबतचा अहवाल उलट-टपाली या कार्यालयास सादर करावा.

४/- महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:पीएवाय १०८२/सीआर-११००(एक)/एसईआर-३, दिनांक ०६, नोव्हेंबर, १९८४ अन्वये पदोन्नतीवर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतन निश्चिती करणेबाबत विकल्प

द्यावयाचा असेल तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासुन १(एक) महिन्याचे आंत द्यावा. व अशाप्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतन निश्चिती म.ना.से.(वेतन) नियम ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची वर नमुद पोलीस कर्मचारी यांनी नोंद घ्यावी. त्यांना पदोन्नती नाकारवयाची असेल तर त्यांची सात दिवसाचे आंत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने अर्ज या कार्यालयास सादर करावा.

प्रत माहितीस :-

पोलीस उपअधिक्षक(मुख्या.), वाशिम/उपविभागीय पोलीस अधिकारी,वाशिम.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना :-

प्रमुख लिपीक लेखाशाखा/पत्रव्यवहार शाखा/वेतन लिपीक/विभागीय चौकशी लिपीक/आस्थालि.२ व ३/ डिपीजी लिपीक/ संगणक कक्ष पोलीस अधीक्षक, कार्यालय वाशिम.

२/- संगणक प्रमुख यांनी सदरचे आदेश त्वरीत पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे **"संकेतस्थळावर"** सर्वाकरीता उपलब्ध करुन देण्या यावेत. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा/रापोनि.,पोलीस मुख्यालय, वाशिम यांचे संकेतस्थळावर **"ई-मेल"** द्वारे त्वरीत कळवावे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

मा.पोलीस उप-महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.